वाटचाल ग्रामविकासाकडे...

# शिक्षण विभाग (माध्यमिक)










# शिक्षण विभाग (माध्यमिक)

विभागाच्या कार्यक्षेत्रात जिल्हयातील सर्व शासन मान्य माध्यमिक शाळा येतात. यामध्ये प्रामुख्याने अनुदानित, विनाअनुदानित, कायम विना अनुदानित इत्यादी प्रकार असून विविध माध्यमांच्या संस्थांतर्गत शाळा असतात. यामध्ये इ. ५ वी तेइ.१० वी,इ.५ वी ते इ.१२ वी, इ.८वी ते १० वी, इ.८ वी ते इ.१२ वी अशा प्रकारच्या शाळांचे प्रशासन या विभागा मार्फत चालविले जाते. सर्व शाळांमध्ये शासनाच्या विविध योजना राबविल्या जातात. प्रती वर्षी शासन निकषानुसार पट निश्चिती केली जाते. वेतन पथक व माध्यमिक शिक्षण विभाग या दोन्हींचे विभाग प्रमुख म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) काम पाहतात. माहिती व संगणक युगात माध्यमिक शिक्षण विभागाचे काम संगणकाच्या मदतीने केले जाते.

## माध्यम निहाय माध्यमिक शाळा संख्या सन २०११ - २०१२

| अ.क्र. | माध्यम | अनु. शाळा | अंशतःअनु. शाळा | विना अनु. शाळा | कायम विना शाळा | एकूण शाळा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ५६७ | - | ५३ | - | ६२० |
| २ | इग्रजी | १ | - | - | ३० | ३१ |
| ३ | उर्दु | ६२ | - | १३ | - | ७५ |
| ४ | हिंदी | ५ | - | - | - | ०५ |
| ५ | कन्नड | - | - | - | - | ०० |
| ६ | सिंधी | ३ | - | - | - | ०३ |
| | एकूण | ६३८ | - | ६६ | ३० | ७३४ |

# विभागाकडील योजना

## विद्यार्थी लाभाच्या विविध योजनाः

१) माध्यमिक पुसतक पेढी योजना

२) पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

३) ग्रामीण भागातील हुशार (प्रज्ञावान) विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

४) ग्रामीण भागातील हुशार आणि पात्र विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या –होतकरू विद्यार्थ्यांना राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

५) आर्थिक दृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

६) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती.

७) आजी/माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना/पत्नींना/विधवांना शैक्षणिक सवलती.

८) ज्यांचे किंवा ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रूपये १५,००० पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यांना फी माफी.

९) इ.१० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण.

१०) इ.११वी १२वी मध्ये मुलींना मोफतशिक्षण

११) आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन.

१२) टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्ष फी माफी/प्रतिपुर्ती.

१३) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मोफत शिक्षण.

१४) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना पदव्युत्तर स्तरांपर्यंत.

१५) अल्पसंख्यांक समाजातील इयत्ता १ ली ते १० वी पर्यत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

१६) प्राथमिक/माध्यमिक आणि विषेश शिक्षक तसेच आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षक यांना राज्यशिक्षक पुरुस्कार

१७) शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणा-या शैक्षणिक संस्थांना राज्य पुरस्कार

१८) विज्ञान प्रदर्शन

१९) बाल चित्रकला स्पर्धा

२०) मानवविकास योजना

२१) केंद्र पुरस्कार माध्यमिक शाळेतील मुलींना प्रोत्साहनपर भत्ता योजना

२२) राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना

२३) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परिक्षा

२४) नाटय स्पर्धा

२५) राष्ट्रीय अर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना

२६) राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योंजना

## राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

१) शिक्षक प्रशिक्षण २) प्रयोगशाळा ३) मोफत पाठ्यपुस्तक

४) बांधकाम ५) संगणक प्रयोगशाळा

## इयत्ता ११ वी १२ वी मध्ये मुलींना मोफतशिक्षण

महाराष्ट्र शासनाने दि. २४ ऑगष्ट १९८३ पासुन राज्यातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळातील मुलींना इयत्ता ५ वी ते १० वी पर्यतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानंतर १९८७ मध्ये इ. १ ली ते १२ वी पर्यतचे शिक्षण सर्वच मुलींना मोफत केलेले आहे. ही योजना १९९६-९७ पासून कार्यान्वित झाली आहे. शैक्षणिक वर्षात किमान आवश्यक उपस्थिती आणि समाधानकारक प्रगती या अटीवर पुढील शैक्षणिक वर्षीही सवलत चालू राहते. शासनाकडून अनुदानित उच्च माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविदयालय, यांचेवेतनावर १०० % अनुदान दिले जात असल्याने अनुदानित कनिष्ठ महाविदयालयांना शैक्षणिक शुल्क, सत्र शुल्क, प्रवेश शुल्क यांची प्रमाणीतदाराने प्रतीपुर्ती करण्यांत येते, या योजनेच्या लाभासाठी कोणत्याही प्रकारच्या उत्पन्नाची अट नाही. त्यामुळे सर्व आर्थिक स्थरावरील विदयार्थीनी पात्र ठरतात. कुटूंबातील पहिल्या तीन अपत्यांनाच या योजनेचा लाभ मिळतो.

## आदिवासी विदयार्थ्यांना विदयावेतन

आदिवासी विदयार्थ्यांना शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी तसेच विदयार्थ्यांना शाळेत येण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उददेशाने विदया वेतन योजना राबवण्यात येते, गरीबीमुळे आदिवासी विदयार्थी/विदयार्थीनींची शाळेतील उपस्थिती कमी असते. शाळेतील उपस्थिती वाढविण्यासाठी विदयार्थ्यांना गणवेश, पुस्तके,पाटया इत्यादी शालेय साहित्य मोफत पुरविण्यात येते, या योजनेव्दारे अनुसूचित जमातीच्या इ. ५ वी ते १० वी च्या विदयार्थ्याला वर्षाला सरासरी ५०००/- रुपये विदयावेतन देण्यात येते.

| इयत्ता | मुलांना | मुलींना |
|---|---|---|
| इ. ५ वी ते ७ वी | रु.४०/- | रु.५०/- |
| इ. ८ वी ते १० वी | रु.५०/- | रु.६०/- |

**टिप :-** ज्या ठिकाणी मोफत राहण्याची व जेवणाची सोय असते. अशा आश्रम शाळा व निवासी शाळेतील विदयार्थी विदया वेतनास पात्र नाहीत. विदयावेतनासाठी विदयार्थ्याची वर्तणूक चांगली असावी. शाळेती कमीत कमी ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे.

## संपर्क

| | | |
|---|---|---|
| ग्रामपंचायत | :- | मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा |
| पंचायत समिती | :- | गटशिक्षणाधिकारी |
| जिल्हा परिषद | :- | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद |

*विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय।*
*शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया ।।*
*आपणासि वाटे जैसे गाव व्हावे । तैसेची बालकास शिकवावे ।*
*शहाणे करोनी सोडावे। विद्याशिक्षणे सर्वांचे ।।*

- ग्रामगीता